


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २३५, मंगळवार ४ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मळगंगा ट्रस्टमध्ये सत्ताधाऱ्यांचाच डंका

## ■ क्रॉस मतदानामुळे मतमोजणीस उशिर ■ सत्ताधारी म्हणतात मंगळवारचा विजयही आमचाच



**निघोज : संदीप इधाटे**

**गेल्या ४२ वर्षात प्रथमच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्तपदाच्या निवडीसाठी झालेल्या निवडणूकीत अपेक्षेप्रमाणे सत्ताधारी गटाने बाजी मारली. सत्ताधारी मळगंगा पॅनलने २१ पैकी २० जागा जिंकत वर्चस्व सिध्द केले. विरोधी मळगंगा परिवर्तन पॅनलने या चुरशीच्या लढतीत एक जागा जिंकत ट्रस्टमध्ये प्रवेश केला आहे.**

या निवडणूकीत मोठया प्रमाणावर क्रॉस व्होटींग झाल्याने दुपारी साडेचार वाजता सुरू झालेली मतमोजणी सोमवारी पहाटे साडेबारा वाजेपर्यंत सुरू होती. पहाटे एक वाजता निवडणूक निर्ण यअधिकारी प्रभाकर कवाद तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महेश ढवळे यांनी निकाला घोषीत केला. निकालानंतर मळगंगा पॅनलच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण तसेच फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी मोठया प्रमाणावर घोषणाबाजीही करण्यात आली.

मतदानावेळी मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीच्या पार्श्वभुमीवर सत्ताधारी मळगंगा पॅनलच्या कार्यकर्त्यांनी मंडळाचा विजय होणार असा विश्वास व्यक्त करीत मतमोजणीआगोदरच फटाक्यांची आतिषबाजी सुरू केली होती.

सकाळी आठ वाजता मतदानास प्रारंभ झाला. दुपारी दोन वाजेपर्यंत १ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दुपारी चार वाजेपर्यंत १ हजार १८१ पैकी १ हजार ९४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ट्रस्टच्या स्थापनेनंतर प्रथमच विश्वस्तपदाची निवडणूक होत असल्याने निकालाची सर्वांनाच उत्सुकता होती. संपूर्ण राज्य कार्यक्षेत्र असल्याने मुंबई परीसरात ट्रस्टचे दोनशेहून अधिक सभासद आहेत. मुंबई परीसरातून मोठया संख्येने मतदान मतदानासाठी आले होते.

दोन वर्षांपूर्वी ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाची मुदत संपली होती. वार्षिक सर्वसाधारण सभेत विश्वस्त मंडळाची निवडही करण्यात आली होती. मात्र काही सभासदांनी पंचकमिटीवर आक्षेत घेत न्यायालयात दाद मागितली होती. मध्यंतरीच्या काळात पुर्वीचेच विश्वस्त मंडळ कारभार पाहत होते.

अलिकडेच विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात येऊन गुप्त मतदान पध्दतीने विश्वस्त मंडळाची निवड करण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. या निर्णयानंतर दोन दिवसांत निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर करण्यात येऊन २जुन रोजी २१ विश्वस्त पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर बिनविरोध निवडीसाठी प्रयत्नही झाले. कोणत्या गटाला किती जागा यावरून मतभेद होऊन २१ जागांसाठी ८७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. त्यातील ४६ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. उर्वरीत ४१ उमेदवारांपैकी २१ उमेदवार सत्ताधारी मळगंगा पॅनलचे तर माऊली मळगंगा परीवर्तन पॅनलकडून १४ उमेदवार निवडणूकीच्या उतरविण्यात आले होते. स्वतंत्र उमेदवारांपैकी दिलीप ढवण, काळूराम गजरे यांनी विरोधी गटाला तर युवा कार्यकर्ते रूपेश ढवण यांनी सत्ताधारी मंडळास पाठींबा दिला होता.

### स्वतंत्र उमेदवारांना मिळालेली मते

दत्तात्रेय भुकन १८२, गणेश वराळ ६४, दिलीप ढवण ५५, रूपेश ढवण ५४, काळूराम गजरे ३९, सदानंद ढवळे ३३

### २५ मते बाद

एकूण मतदान १ हजार १८१, झालेले मतदान १ हजार ९४, बाद मते २५ वैध मते १०६९.

### लोकसभेचा गुलालही आमचाच !

ट्रस्टच्या विश्वस्तपदाचा निकाल जाहिर झाल्यानंतर सत्ताधारी मंळगंगा पॅनलच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. आजचा गुलाल आमचाच आणि मंगळवारी लोकसभेच्या निवडणूकीतही आमचाच गुलाल असल्याचा विश्वास सत्ताधाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत होता.

### मा. आ. लंके यांचेही मतदान

मा. आ. नीलेश लंके यांच्यासह त्यांच्या घरातील चार सदस्य ट्रस्टचे सभासद आहेत. वर्षभरापूर्वी लंके यांच्या कुटूंबाचे सदस्य ट्रस्टचे सभासद झाले आहेत. दुपारी दोन वाजता मा. आ. नीलेश लंके यांनी मतदान केंद्रावर येत मतदानाचा हक्क बजावला.

### मळगंगा पॅनलचे विजयी उमेदवार

वसंत कवाद ७९५, शांताराम लंके ७९१,अनिल लंके ७५४, अमृता रसाळ ७५१, ठकाराम लंके ७४०,सिमा संदीप वराळ ७३७,विठ्ठल कवाद ७२४, संतोष रसाळ ७१३, शंकर लामखडे ७०९, रामदास वरखडे ६९१, विश्वास शेटे ६८०, रामदास लामखडे ६७७, रामदास ससाणे ६५८, लक्ष्मण ढवळे ६४१, शांताराम कळसकर ६३५,रोहिदास लामखडे ५९३, ज्ञानेश्वर लंके, मोहिनी सोमनाथ वरखडे ५८१, अशोक वरखडे ५७८, मंगेश वराळ ५६० (सर्व विजयी) दिलीप लाळगे ५५६ (पराभूत)

### मळगंगा परीवर्तन पॅनलचे उमेदवार व त्यांना मिळालेली मते पुढीलप्रमाणे

अनिल शेटे ६३०( विजयी), ज्ञानेश्वर वरखडे ५३९, राजेंद्र लाळगे ५१६, देवराम लामखडे ४३९, मनोहर राऊत ४०५, सुनील पवार ३७५, संदीप वरखडे ३७१, मोहन कवाद ३६९, रावसाहेब वराळ ३८८, शांताराम ढवळे २४६, दत्तात्रेय लंके ३४६, राहुल वराळ ३१४, संतोष वराळ २७८, शिवाजी भुकन २६२.

### वाढीव सभासदांमुळे सत्ताधाऱ्यांना संधी

गेल्या दिड वर्षात सत्ताधारी मंडळाने अडीचशेपेक्षा अधिक नवीन सभासदांनी नोंदणी करून घेतली होती. हेच हक्काचे मतदान सत्ताधारी मंडळाच्या विजायास कारणीभुत ठरल्याचे निकालावरून स्पष्ट झाले. विजयी व पराभूत उमेदवारांमध्ये शंभर दिडशे मतांचा फरक आहे. काही उमेदवार निसटत्या मतांनी पराभूत झाले. क्रॉस मतदान होऊनही वाढलेल्या मतदारांनी प्रामाणिक मतदान केल्याने सत्ताधारी मंडळाचा विजय झाल्याची चर्चा निघोजमध्ये सुरू होती.

# मंगळवारी माझे कार्यकर्ते दिवाळी साजरी करणार!

## नीलेश लंके यांना विजयाचा विश्वास

**पारनेर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूकीत दोन लाखांहून अधिक मताधिक्क्याने आपण विजयी होणार असून माझा प्रत्येक कार्यकर्ता मंगळवारी दिवाळी साजरी करणार असल्याचे मा. आ. नीलेश लंके यांनी सांगितले.**



मंगळवारी लोकसभा निवडणूकीची मतमोजणी असून या पार्श्वभुमीवर लंके यांनी माध्यमांशी बोलताना आपला विजय निश्चित असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

लंके म्हणाले, १३ तारखेला मतदान झाले त्याच दिवशी निकाल जाहिर झालेला आहे. उद्या माझ्या विजयाची फॉर्म्युलीटी शिल्लक आहे. मला निकालाची चिंता नाही. निकाल आमच्याच बाजूने लागणार आहे. मतदान झाल्यानंतर गावागावातील आमच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष केला आहे. अनेकांनी गुलालाची उधळण केली. अनेक ठिकाणी अभिनंदनाचे फलक लागले असल्याचे लंके म्हणाले.

किती मताधिक्क्याने विजयी व्हाल या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, मी दोन लाखांहून अधिक मतांनी विजयी होणार असून निकालाबाबत मनामध्ये कोणतीही धाकधूक नाही. गुलाल आपलाचा असल्याचा दावा करतानाच उद्याच्या जल्लोषाची काय तयारी आहे या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, माझी विशेष काही तयारी नसते. माझे सर्वच कार्यकर्ते दिवाळी साजरी करतील असे लंके यांनी सांगितले.

महाराष्ट्रात काय राजकीय चित्र असेल या प्रश्नावर उत्तर देताना राज्यात महाविकास आघाडीचे सर्वाधिक उमेदवार विजयी होतील असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला. माझ्या किंवा कार्यकर्त्यांच्या मनामध्ये निकालाविषयी धाकधूक असती तर कार्यकर्त्यांनी शुभेच्छांचे फलक कशाला लावले असते ? कार्यकर्त्यांना माझ्या विजयाचा विश्वास आहे. शेवटच्या स्तरातील कार्यकर्ता असो, माझ्या सोबत फिरणारा कार्यकर्ता असो किंवा महाविकास आघाडीचे नेते मंडळी असोत सर्वांना माझ्या विजयाबाबत खात्री आहे असे लंके म्हणाले.

या निवडणूकीत अतिशय खालच्या स्तरावर राजकारण केले गेले. अनेक आरोप, प्रत्यारोप करण्यात आले. या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, या निवडणूकीत प्रशासनाचा मोठया प्रमाणावर गैरवापर करण्यात आला. सत्तेचा इतका गर्व योग्य नाही. हा गर्व निश्चित उतरेल असा टोलाही लंके यांनी विखे पिता-पुत्रांचे नाव न घेता लगावला.

# सुजय विखे की नीलेश लंके?

## मतदारांचा कौल कोणाला ? नगर दक्षिणेत उत्सुकता शिगेला

**नगर : प्रतिनिधी**





**नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील जनतेने कोणाला कौल दिला हे स्पष्ट होणार आहे. तत्पूर्वी विविध संस्थांच्या एक्झिट पोलने वर्तविलेल्या अंदाजांमुळे नगर दक्षिणेचे खासदार कोण होणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**

नगर जिल्ह्यातील राजकारण हे नेहमीच पक्षीय राजकारणाला विचार करायला लावणारे ठरले आहे. या जिल्ह्याचे राजकारण सहकारी साखर कारखाने व त्याच्या परिसरातील शैक्षणिक संस्था, नाते-गोते या भोवती फिरणारे ठरले आहे. त्यामुळे येथे पक्षापेक्षा उमेदवार महत्त्वाचा ठरतो. सुरुवातीला जिल्हा सहकारी बँकेतील राजकारणापासून जिल्ह्यातील राजकारणावर नियंत्रण मिळविण्याला भाऊसाहेब थोरातांनी सुरुवात केली. आणि नंतर बाळासाहेब विखेंनीही यात मास्टरी मिळविली.

जिल्हा विकास आघाडीच्या माध्यमातून प्रत्येक तालुका व गावागावांत त्यांनी आपली कार्यकर्त्यांची फळी उभी केली. त्यालाच विखे गट असे म्हटले जाते. विखे असो अथवा थोरात या दोन्ही गटातील कार्यकर्ते सर्वच पक्षांत आहेत. त्यामुळे ऐन निवडणुकीत हे कार्यकर्ते वरकरणी एका पक्षाचे काम करताना दिसतात अन् ऐन वेळी मतदान दुसऱ्यासाठी घडवितात. हे जिल्ह्याचे अजब राजकारण आहे. दोन्ही मतदारसंघात बाळासाहेब थोरात व राधाकृष्ण विखे पाटील यांनी मैदान पिंजून काढले. मात्र, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केवळ अहमदनगर लोकसभा मतदारसंघात तर उद्धव ठाकरे यांनी शिर्डी लोकसभा मतदारसंघातच आपापल्या पक्षाच्या उमेदवारासाठी सभा घेतल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नगर शहरात महायुतीच्या दोन्ही उमेदवारांसाठी सभा घेतली.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी दोन दिवसांपूर्वीच मला सर्वच पक्षीयांनी मदत केल्याने माझा विजय होणार असल्याचे सांगितले. तर विखे गटानेही आपली ताकद वापरल्याची चर्चा आहे.नेहमीप्रमाणे यंदाची लोकसभा निवडणुकीतील मतदान प्रक्रियेत पक्षाच्या नावाने एकाचा प्रचार व ऐन वेळी दुसऱ्यासाठीच उर्वरीत पान ३ वर







स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# कारळा लागवड

**तेलबिया पिकातील कारळा हे आरोग्याच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे पीक आहे. कारळा याला स्थानिक भाषेमध्ये खुरासणी, रामतीळ असेही म्हटले जाते. या पिकाखालील एकूण क्षेत्र व उत्पादनामध्ये जागतिक पातळीवर भारताचा प्रथम क्रमांक आहे...**



कारळा बियांमध्ये ३५ ते ४० टक्के तेल, २० ते २५ टक्के प्रथिने, १० ते २० टक्के तंतुमय पदार्थ असून, १० टक्के आर्द्रता व १२ ते १८ टक्के विद्राव्य शर्करा असते. कारळा तेलामध्ये लिनोलेईक आम्ल ७५ ते ८० टक्के व ओलिक आम्ल ५ ते ८ टक्के असून, हृदयरोग नियंत्रणासाठी उत्तम तेल मानले जाते. कारळाचा उपयोग हा खाद्यतेल, वंगण व रंगनिर्मिती, साबण निर्मिती, पक्षिखाद्य तयार करण्यासाठी होतो. तेल काढणीनंतर उर्वरित पेंड ही सकस पशुखाद्य असून, त्यात ३१ ते ४० टक्के प्रथिने असतात.

- जमीन अन् हवामान : हलकी ते मध्यम भारी प्रतीची व उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. हे प्रामुख्याने खरीप हंगामातील पीक असून, वार्षिक सरासरी पाऊसमान १००० ते २००० मि.मी. असणाऱ्या प्रदेशात हे पीक चांगल्या प्रकारे येते. जून ते सप्टेंबर या दरम्यान पडणारा पाऊस चांगले उत्पादन देतो. उशिरा पडणारा या पिकास मानवत नाही.
- पूर्वमशागत, पेरणी : जमिनीची नांगरणी करून २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. त्यानंतर एकरी २ गाड्या चांगले कुजलेले शेणखत शेतात टाकून कुळवाच्या पाळी द्यावी. या पिकाची पेरणी साधारणपणे १५ जून ते १५ जुलै या कालावधीत करावी. जुलैचा पहिला पंधरवडा हा पेरणीसाठी उपयुक्त मानला जातो.
- बियाणे प्रमाण, पेरणीचे अंतर, बीजप्रक्रिया : पेरणीकरिता एकरी दीड ते दोन किलो बियाणे वापरावे. बियाण्याचा आकार लहान असल्याने बारीक वाळू, माती व शेणखत समप्रमाणात मिसळून पेरणी करावी. पेरणी शक्यतो तिफण किंवा पाभरीने करावी.दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपांतील अंतर १० सें.मी. इतके ठेवावे. बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणाकरिता प्रति किलो बियाण्यास कार्बेन्डाझिम ३ ग्रॅम अशी प्रक्रिया करावी. त्यानंतर अझोस्पिरिलम २५ ग्रॅम व पी.एस.बी. २५ ग्रॅम प्रति किलो या जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.
- विरळणी : कारळा बियाणे लहान असल्याने पेरणीवेळी एका जागी अधिक बियाणे पडण्याची शक्यता असते. त्यामुळे रोपांची संख्या वाढून रोपांची वाढ जोमाने होत नाही. पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी दोन रोपांतील अंतर १० सें.मी. ठेवून विरळणी करावी.
- खत व्यवस्थापन : एकरी १६ किलो नत्र म्हणजे ३६ किलो युरिया व ८ किलो स्फुरद म्हणजे ५० किलो एस.एस.पी. द्यावे. या पैकी नत्राची अर्धी मात्रा आणि संपूर्ण स्फुरद पेरणीवेळी द्यावे. उर्वरित नत्राची अर्धी मात्रा पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावी.

### सुधारित वाण

पी.एन.एस.-६, फुले वैतरणा, सह्याद्री, फुले कारळा, आर.सी.आर.-३१७

## उत्पादन वाढीसाठी टिप्स...

- नवीन संशोधित वाण सरळ व उंच वाढणारे असल्यास, फांद्या व फुलांची संख्या अधिक येण्यासाठी शेंडा खुडण्याची शिफारस केली आहे. ही शेंडा खुडणी पेरणीनंतर ५० दिवसांनी शेंड्यांकडील तीन पानांपर्यंत करावी.
- कारळा पिकाच्या चिकट पराग कणांचे हवेमार्फत परागीभवन होण्यास अडचणी येतात. परिणामी, परागीभवन होऊन बी तयार होण्यासाठी कीटकांवर अवलंबून राहावे लागते. कारळाची फुले पिवळ्या रंगाची असून, पेरणीनंतर ५० ते ८० दिवसांपर्यंत टिकतात. त्याकडे कीटक आकर्षित होतात. एक एकर क्षेत्रासाठी एक मधमाशी पेटी ठेवल्यास उत्पादनात २० ते २५ टक्के वाढ दिसून येते.
- काढणी, मळणी व उत्पादन : हे पीक १०० ते ११० दिवसांत कापणीस तयार होते. बोंडांचा वरील भाग काळा पडल्यावर काढणीस तयार झाल्याचे समजावे. पीक पक्व झाल्यावर बोंडातील दाणे मोकळे होतात. पिकाची काढणी योग्य वेळी करणे अतिशय महत्त्वाचे आहे. ते काढणीनंतर दोन ते तीन दिवस उन्हात वाळवावे. नंतर बडवून बी मोकळे करून घ्यावे.

# जमीन सुपीक करणारी हिरवळीची खते!

**जमिनीचा पोत टिकविणे आणि उत्पादन वाढविण्यासाठी हिरवळीची खते महत्त्वाची आहेत. हिरवळीची पिके फुलोरा येण्यापूर्वी जमिनीत गाडल्यापासून मुख्य अन्नद्रव्ये आणि सेंद्रिय घटकांचा पुरवठा जमिनीस होतो.**

## हिरवळीच्या खतांचे फायदे

यामध्ये ह्यूमस असते, त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो. या खतामधील सेंद्रिय द्रव्यांमुळे जमिनीतील सूक्ष्म जीवाणूंना अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. परिणामी जिवाणूंची वाढ भरपूर होऊन त्यांची कार्यशक्ती जोमाने वाढते. जमिनीतील पोषक द्रव्ये रासायनिक क्रियेने विरघळून ती पिकांना सुलभ स्थितीत प्राप्त होतात. लवकर कुजणारी हिरवळीची खते वापरल्यामुळे एकूण नत्र, उपलब्ध स्फुरदाचे प्रमाण आणि अझोटोबॅक्टर सारख्या जीवाणूंचे प्रमाण वाढते. जमिनीत टिकून राहणाऱ्या कणसमूहांचे प्रमाण वाढते. जमिनीची जलधारणा क्षमता वाढते. पावसाच्या पाण्यामुळे होणारी जमिनीची धूपही कमी होते. सेंद्रिय पदार्थांमुळे माती रवेदार होण्यास मदत होते. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत साचून न राहता त्याचा निचरा लवकर होतो. हलक्या जमिनीत देखील सेंद्रिय पदार्थांमुळे पाणीधारण करण्याची क्षमता वाढते. द्विदल वर्गातील हिरवळीची पिके ही हवेतील नत्र शोषून घेतात. हे नत्र जमिनीत साठविले जाऊन ते पुढील पिकांना उपलब्ध होते. क्षारपड जमिनीत हिरवळीचे पीक गाडण्यामुळे क्षार कमी होऊन त्या जमिनी लागवडीखाली येतात. ही पिके जमिनीत असेंद्रिय स्फुरदाचे सेंद्रिय स्फुरदात रूपांतर करतात. जमिनीतील स्फुरदाची उपलब्धता वाढवितात. पिकांच्या दाट वाढीमुळे तणांचे नियंत्रण होण्यास मदत होते.

## हिरवळीच्या खतांसाठी योग्य असलेली पिके

- ताग/बोरू : हे हिरवळीचे उत्तम खत आहे. ज्या विभागात पुरेसा पाऊस किंवा सिंचनाच्या पाण्याची हमी असते तेथे तागाचे पीक घेण्यात यावे. सर्व प्रकारच्या जमिनीत या पिकाची वाढ चांगली होत असली तरी आम्लधर्मीय जमिनीत याची वाढ जोमाने होत नाही. तसेच पाणी साचून राहणाऱ्या शेतात तागाची चांगली वाढ होत नाही. पावसाळ्याच्या सुरुवातीस हेक्टरी ५० ते ६० किलो तागाचे बी पेरावे. पेरणीनंतर ५ ते ६ आठवड्यांनी हे पीक फुलोऱ्यावर येण्याच्या सुमारास नांगराच्या साहाय्याने जमिनीत गाडून टाकावे. तागामध्ये नत्राचे प्रमाण ०.४६ टक्के आहे. हेक्टरी ८० ते ९० किलो नत्र मिळते.
- धैंचा : तागापेक्षा काटक असे हिरवळीचे हे पीक असून कमी पर्जन्यमान, पाणथळ ठिकाण, क्षारमय अथवा आम्लधर्मीय जमिनीत सुद्धा हे पीक तग धरू शकते. या वनस्पतीच्या मुळांवर तसेच खोडावरही गाठी दिसून येतात या गाठीमध्ये रायझोबियम जीवाणू सहजीवी नत्र स्थिरीकरणाच्या प्रक्रियेने हवेतील नत्राचे स्थिरीकरण करतात. लागवडीसाठी हेक्टरी २५ ते ४० किलो बियाणे पावसाळ्याच्या सुरुवातीस शेतात पेरावे. पेरणीपूर्वी रायझोबियम जिवाणू संवर्धनाची प्रक्रिया बियाण्यास करावी. पिकाच्या वाढीसाठी आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करून पीक ६ ते ७ आठवड्यात ९० ते १०० सेंमी उंचीपर्यंत वाढले असता जमिनीत नांगराने गाडून टाकावे. या काळात धैंच्यापासून १० ते २० टनापर्यंत हिरव्या सेंद्रिय पदार्थाची निर्मिती होते. या वनस्पतीत नत्राचे शेकडा प्रमाण ०.४६ टक्के इतके आहे. भात लावणी करण्यापूर्वी आठ दिवस पीक जमिनीत गाडल्यास हेक्टरी ८० किलो नत्राची उपलब्धता होऊ शकते.
- घेवडा : हे पीक कमी पर्जन्यमान व हलक्या प्रतीच्या जमिनीत चांगले वाढते. पाणथळ जमिनीस हे पीक योग्य नाही. पावसाळ्याच्या सुरुवातीला प्रती हेक्टरी ५० किलो बियाणे पेरावे. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात ते जमिनीत गाडावे.
- द्विदल कडधान्याची पिके : पावसाळ्याच्या सुरुवातीस शेत तयार करून मूग, चवळी, उडीद, गवार यांचे बियाणे शेतात पेरले असता या द्विदल वर्गीय पिकांचा हिरवळीच्या खताशी चांगला उपयोग होतो. जमिनीची पूर्व मशागत केल्यावर मूग, उडीद, कुळीथ यांचे प्रति हेक्टरी २५ ते ३० किलो बियाणे पेरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास रायझोबियम जीवाणू संवर्धक चोळून आवश्यकतेनुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पीक फुलोऱ्यावर येण्यापूर्वी नांगरणी करून जमिनीत गाडले असता यापासून प्रति हेक्टरी ५० ते ६० किलो नत्र पिकास उपलब्ध होते.
- गिरीपुष्प (ग्लिरिसिडिया) : झुडुप वर्गातील हे पीक कोणत्याही प्रकारच्या जमिनीत, निरनिराळ्या पर्जन्यमानाच्या प्रदेशात चांगले येते. छाट कलमाद्वारे लागवड करण्यासाठी ३० सेंमी लांब आणि ३ सेंमी व्यासाची दोन छाट कलमे निवडून पावसाळ्याच्या सुरूवातीस ३० बाय ३० बाय ३० सेंमी आकाराचा खड्डा करून बांधावर किंवा पडीक जमिनीत लागवड करावी. गादी वाफे तयार करून किंवा प्लॅस्टीकच्या पिशवीत बी पेरून रोपे तयार करावे. ही रोपे पाच आठवड्यांची झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस शेताच्या बांधावर खड्डे खोदून लावावीत. पहिल्या वर्षी उन्हाळ्यात रोपांना पाणी देणे आवश्यक असून दुसया वर्षापासून पुढे प्रत्येक छाटणीला २५ ते ३० किलो हिरवा चारा मिळू शकतो. या झाडाच्या फांद्याची वरचेवर छाटणी करून या झाडांना नवीन फूट येते. त्यांच्या हिरव्या पालवीपासून हिरवळीचे उत्तम खत मिळते. गिरीपुष्पाची पाने धैंचा, वनझाडाच्या पालापाचोळ्यापेक्षा जलद कुजतात. गिरीपुष्पाच्या पानांमध्ये सेंद्रिय कर्ब ३६ टक्के, नत्र २.७० टक्के, स्फुरद ०.५ टक्के, पालाश १.१५ टक्के आहे. नत्रयुक्त खतांच्या खर्चात बचत होते.

## हिरवळीच्या पिकांचे नियोजन

- पिकांची निवड : मातीत आद्रता, खतासाठी लागणारा वेळ या गोष्टी लक्षात घेऊन शेंगवर्गीय पिकांची निवड करावी.
- पेरणीची वेळ : मृगाचा पहिला पाऊस पडल्यावर हिरवळीच्या पिकांची पेरणी करणे योग्य असे मानले जाते. मात्र ही वेळ प्रदेशनिहाय वेगळी असू शकते. पुरेशा आद्रतेमध्ये बियांची उगवण चांगली होते.
- जमिनीमध्ये गाडण्याची योग्य वेळ : सर्वसाधारणपणे पीक फुलात आल्यावर ती गाडावीत. यासाठी पेरणीनंतर साधारणपणे ६ ते ८ आठवडे लागतात.
- हिरवळीची पिके गाडल्यानंतर मुख्य पिकांची पेरणी यातील कालावधी : मातीत गाडलेल्या पिकांना कुजवण्यासाठी किती वेळ लागतो, यावर मुख्य पिकांची पेरणी करण्याचे नियोजन करावे. जाडसर, रसाळ देठ व पाने कुजवण्याला कमी वेळ लागतो. मातीचा पोत व आद्रता ही सुद्धा महत्त्वाची आहे. हलक्या मातीमध्ये योग्य आद्रता असताना हिरवळीचे खत गाडल्यानंतर ७ ते १२ दिवसांनी पेरणी करावी.
- अन्नद्रव्यांची उपलब्धता : पिकांच्या भरघोस वाढीसाठी लागणारे मुख्य अन्न घटक व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये हिरवळीच्या पिकांच्या कुजण्यातून मातीत उपलब्ध होतात. ही प्रक्रिया मातीच्या रासायनिक, भौतिक, जैविक पातळीवर अवलंबून असते.
- हिरवळीच्या खतांचे गुणधर्म : प्रति हेक्टर सुमारे ५० ते १७५ किलो नत्र उपलब्ध होते. जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढतो. मातीची पाणी व अन्नद्रव्ये धरून ठेवण्याची क्षमता वाढते. उपयुक्त सुक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते. जमिनीची भौतिक स्थिती सुधारते. अन्य मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्ये उपलब्ध होण्यास मदत होते.
- हिरवळीच्या खतांच्या मर्यादा : लागवडीसाठी क्षेत्र, कालावधी व पाण्याची उपलब्धता आवश्यक असते. बियांचा खर्च वाढतो. आंतरपीक म्हणून घेताना मुख्य पिकांशी स्पर्धा करू शकतात.
- हिरवळीच्या खतांची कार्यशक्ती : सर्वसाधारणपणे १ टन हिरवळीचे किंवा शेंगवर्गीय पिकापासून बनलेले खत हे २.८ ते ३ टन शेणखत किंवा ४.५ ते ४.७ किलो नत्र किंवा १० किलो युरियाच्या बरोबर असते. म्हणजेच २४ ते ३० किलो नत्राचा पुरवठा करण्यासाठी ६ टन हिरवळीचे खत प्रति हेक्टरी वापरावे लागते.



## हिरवळीच्या खताचे प्रकार

- शेतात लागवड करण्यायोग्य हिरवळीचे खते : ज्या शेतात हिरवळीचे खत गाडावयाचे आहे तिथेच हिरवळीचे पीक सलग शेतात पेरले जाते. हे पीक फुलोरा येण्यापूर्वी नांगरणी करून जमिनीत गाडले जाते किंवा मुख्य पिकांसोबत आंतरपिके म्हणून याची वाढ करून ती जमिनीत मिसळले जाते. उदा. बोरू (ताग), धैंचा, मूग, चवळी, मटकी, शेवरी, लसूणघास, बरसीम.
- हिरवळीचे पीक घेऊन पालापाचोळ्यापासून खत : या पद्धतीमध्ये वनस्पतीच्या नाजूक हिरव्या फांद्या व पाने लुसलुशीत कोवळी असतात. अशा झाडांची लागवड बांधावर करून किंवा परिसरातील जंगलातून फांद्या, पाने गोळा करून शेत नांगरणी किंवा विलगीच्या वेळी जमिनीत गाडतात. उदा. गिरीपुष्प, शेवरी, करंज, सुबाभूळ इत्यादी.

## हिरवळीचे खत वापरायची पद्धत

आपल्याला ज्या शेतात हिरवळीचे खत द्यायचे आहे, त्यामध्ये हिरवळीच्या पिकाची मे-जून महिन्यात पेरणी करावी किंवा बियाणे फेकून द्यावे. बियाणाचे प्रमाणे दीडपट जास्त वापरावे. जेणेकरून पीक दाट येईल. हिरवळीच्या पिकात हेक्टरी २० ते २५ किलो नत्र स्थिरीकरणाची प्रक्रिया जोमाने होते. अशा प्रकारे लावलेल्या पिकांची पर्णीय वाढ झाल्यावर फुलोऱ्यात येण्याआधी म्हणजे पेरणीपासून ६ ते ८ आठवड्यांसाठी ते पीक नांगरून जमिनीत गाडावे, शेतात पाणी द्यावे. त्याचे पूर्ण विघटन झाल्यावर पुढील रब्बी पिकाची वेळेवर पेरणी करावी. हिरवळीचे पीक आंतरपीक म्हणून देखील घेता येते. उदा. कापूस, मका व फळबागेत ताग, धैंचा, बरसीम, चवळी ही हिरवळीची पिके आंतरपीक म्हणून पेरून ६ ते ८ आठवड्यांनी जमिनीत गाडून टाकावीत. हिरव्या पानांचा वापर करावयाचा असल्यास या पिकांची बांधावर किंवा पडीक जमिनीत लागवड करावी. हिरवी कोवळी पाने गोळा करून ती पूर्व मशागतीच्या वेळी जमिनीत मिसळावीत.



# पेरणी योग्य ओलाव्यावरच करा!





## बाजरी

बाजरी पिकाकरिता पाण्याचा उत्तम निचरा होणारी हलकी ते मध्यम जमीन निवडावी. हलक्या जमिनीत बाजरी हे पीक घ्यावयाचे असल्यास सरी-वरंबा पद्धत फायदेशीर ठरते. पेरणी १५ जून ते १५ जुलैदरम्यान करावी. पेरणीकरिता फुले आदिशक्ती, फुले महाशक्ती या संकरित जाती आणि धनशक्ती ही सुधारित जात निवडावी. हेक्टरी ३ ते ४ किलो या प्रमाणात बियाणे वापरावे. प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम पीएसबी जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी २ ते ३ से.मी.पेक्षा जास्त खोलीवर करू नये. कोरडवाहू क्षेत्रात ४५ x १५ सें.मी व नियमित पावसाच्या ठिकाणी अथवा पाण्याची सोय असल्यास ३० x १५ से.मी अंतरावर पेरणी करावी. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरीलम व स्फूरद विरघळवणाऱ्या जीवाणू संवर्धनाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी करताना ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश हलक्या जमिनीत तर मध्यम जमिनीत ५० किलो नत्र २५ किलो स्फूरद आणि २५ किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. रासायनिक खते दोन चाडीच्या पाभरीने पेरून द्यावे.

## सोयाबीन

पेरणीकरिता मध्यम काळी पोयट्याची, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. पेरणी खरिपात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात वापशावर करावी. भारी जमिनीत पेरणी ४५ x ५ सें.मी. आणि मध्यम जमिनीत ३० x १० सें.मी अंतरावर करावी. सलग पेरणीकरिता ७५-८० किलो प्रति हेक्टर तर टोकण करण्याकरिता ४५-५० किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. पेरणीकरिता जे.एस.३३५, एम.ए.सी.एस ११८८, फुले कल्याणी (डी.एस २२८), जे.एस ९३०५, कें.एस.१०३, फुले अग्रणी (केडीएस ३४४) आणि फुले संगम (केडीएस ७२६) या जातींची निवड करावी. प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. आंतरपिकामध्ये सोयाबीन + तूर (३:१) या प्रमाणात घ्यावे. सोयाबीन पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ७५ किलो स्फूरद आणि ४५ किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. खते पेरणीपूर्वी जमिनीत मिसळून द्यावीत अथवा दोन चाड्याच्या पाभरीने खते व बियाणे एकाच वेळी पेरून द्यावे.

## तूर

पेरणीकरिता लवकर तयार होणारे आयसीपीएल ८७, विपुला, फुले राजेश्वरी, बीडीएन ७११ या जातींची निवड करावी. लागवडीसाठी ९० x ६० सें.मी. अथवा १८० x ३० सें.मी. अंतर ठेवावे. याशिवाय बीएसएमआर ७३६, बीएसएमआर ८५३ हे मध्यम उशिरा येणाऱ्या जातींची निवड करावी. प्रती किलो बियाणास २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम पीएसबी या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणी करतेवेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी वापरावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. हेक्टरी जातीपरत्वे १० किलो बियाणे वापरावे. टोकण पद्धतीने पेरणी केल्यास बी कमी लागेल.



## शॉर्ट न्यूज

### कांदा गोण्यांची चोरी करणाऱ्या दोघांना अटक

**घोडेगाव :** येथे आडत दुकानातून दोन दिवसापूर्वी ५० गावरान कांदा गोण्यांची चोरी करणारे दोन आरोपी सोनई पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. शेडच्या खाली माती उकरून चोरटे दुकानात शिरले होते. आरोपींनी ५० हजार रुपये किमतीच्या ५० गावरान कांद्याच्या गोण्या चोरून नेल्या होत्या. चोरटे कांदा विक्रीकरिता चालल्याची माहिती मिळाली असता पथकाने धनंजय बाळासाहेब आल्हाट, समीर सलीम सय्यद या दोघास अटक केली आहे. सोनई पोलिसांनी आरोपी आल्हाट व सय्यद यास नेवासे न्यायालयापुढे उभे केले असता तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### युवक काँग्रेसची जिल्हा प्रशासनाकडे मागणी

**नगर :** शहरात वाचनालय व अभ्यासिका उभारण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्र. निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी युवकचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर, किरण घुले, केतन ढवण, मंगेश शिंदे, ऋषिकेश जगताप, दिपक वाघ, गौरव हरबा, आशुतोष पाणमळकर, स्वप्नील कांबळे, शिवम कराळ, पंकज शेंडगे आदी उपस्थित होते.

### नेवासात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**नेवासा बुद्रुक :** येथील म्हाळसा खंडोबा बाणाई पुरातन देवस्थानच्या वतीने यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांचा गौरव उपक्रम समाजासाठी आदर्शवत प्रेरणा देणारा असल्याचे प्रतिपादन संभाजी पवार यांनी केले. परिस्थिती फारशी प्रतिकूल नसेलही, पण अनुकूल ही नक्कीच नव्हती, ग्रामीण भागातील मुले क्लासेस ची कोणतीही व्यवस्था नाही. पुढील मार्गदर्शनाच्या कोणतीही सोय नाही. तरीही फक्त कष्ट आणि जिद्द यावर दहावीच्या आणि बारावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळवणाऱ्या मुला मुलींचा सत्कार करण्यात आला.

### पोलिस लाचलुचपतच्या जाळ्यात

**श्रीरामपूर :** शहर पोलिस ठाण्यातील हवालदाराला एका गुन्ह्यात बंदचा अहवाल देण्याच्या प्रकरणात लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. रात्री उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती. उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. मात्र, शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक नितीन देशमुख यांनी एका पोलिस कर्मचाऱ्यावर ठाण्याच्या आवाराबाहेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची करवाई झाल्याचे सांगितले.

### खंदरमाळवाडी येथे घरफोडी

**संगमनेर :** तालुक्यातील खंदरमाळवाडी येथे अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून अर्धा तोळे सोने व रोख रक्कम चोरून पोबारा केला आहे. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. सुमन पांडुरंग भोजणे (वय ५०) यांच्या घरात अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून प्रवेश केला आणि १८ हजार रुपये किमतीचे अर्धा तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ५ हजार रुपये असा एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# ५७६ कोटींचा खर्च होऊनही जलजीवन फेल

**६ लाख लोकांसाठी टँकरचे पाणी | चार वर्षांत अवघ्या १५.५४ टक्के योजना पूर्ण**

नगर : प्रतिनिधी



**पंतप्रधान नरेंद्र मोदींची महत्त्वाकांक्षी असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत २०२४ पर्यंत हर घर नल से जल देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्रशासनातील विसंवाद तसेच कामात होत असलेल्या दिरंगाईमुळे नियोजित कालावधीत अवघे १५.५४ टक्के योजनांची कामे शंभर टक्के पूर्ण झाली. त्यामुळे ५७६ कोटी खर्च होऊनही, सद्यस्थितीत ६ लाख लोकसंख्येची तहान नळाच्या पाण्यावर नव्हे, तर टँकरमधून आणलेल्या पाण्यावर भागवावी लागत आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जल जीवन मिशनची घोषणा २०१९ मध्ये केली असली, तरी महाराष्ट्रातील मंत्रिमंडळाने जुलै २०२० रोजी मान्यता दिली. जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या पूर्वीच्या योजनांची बांधणी प्रतिमानसी ४० लिटर पाणी उपलब्ध करून देता येईल, या पद्धतीने केली होती. त्यानंतर आणलेल्या जलजीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे शुद्ध ५५ लिटर पाणी देण्यात येणार आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या सुमारे ५९१ योजनांच्या पुनर्बांधणी तर २३८ नवीन योजनांची नव्याने उभारणी करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. सर्व कामांना यापूर्वीच सुरूवात झाली असली तरी ढिसाळ व संथ कारभारामुळे या योजनेला गती मिळाली नाही.आतापर्यंत या योजनेसाठी ५७६ कोटी ५६ लाखांचा खर्च झाला तरी, आजही जिल्ह्यात टंचाईची स्थिती गंभीर आहे.

नगर जिल्ह्यात जलजीवनच्या योजना पूर्ण होण्यात सर्वात मोठा अडसर राजकीय हस्तक्षेप ठरतो. वाढीव वाड्या वस्त्या जोडण्याची मागणी ऐनवेळी झाली. जागांच्या अडचणी सोडवतानाही बराच वेळ गेला. गावपातळीवर असलेले राजकीय वाद व योजनांच्या कामांच्या दर्जाबाबत असलेल्या तक्रारी येत असल्याने कामाच्या गतीवर परिणाम झाला.दिरंगाईमुळे ४०० योजनांना प्रत्येकी ५०० दंड योजनांच्या कामात होत असलेल्या दिरंगाईमुळे जिल्हा परिषदेने ४०० योजनांपोटी प्रत्येक ठेकेदारावर १ जानेवारी मार्च २०२४ पर्यंत दररोज २०० रूपये दंड करण्यात आला. सद्यस्थिती दंडाची रक्कम प्रतियोजना ५०० रुपये करण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे २० लाखांचा दंड वसूल केल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने सांगितले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन**




नगर :प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत विश्वनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याच्या निर्धार देशातील जनतेने केला होता.मतदानानंतर आलेल्या कल चाचण्यातून यावर शिक्कामोर्तब झाले असल्याचे मत महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.**

माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की.अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघात महायुतीचाच विजय होणार असा विश्वास व्यक्त करून लोकांनी विकास प्रक्रीयेला साथ दिली असल्याचे त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास प्रक्रीयेला देशातील मतदारांनी पाठबळ दिले.अहील्यानगर मतदार संघातही जनतेन विकासालाच प्राधान्य दिले.त्यामुळे महायुतीच्या उमेदवाराचा विजय होणार हा विश्वास आमचा कायम असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केलेल्या दाव्याची खिल्ली उडवताना मंत्री विखे पाटील म्हणाले की ज्यांना कॉग्रेससाठी जिल्ह्यात एकही जागा आणता आली नाही. त्यांनी दुसऱ्यांची तळी उचलण्यात त्यांनी धन्यता मानली.आता स्वता:च्या अस्तित्वाची चिंता करा असा खोचक सल्ला मंत्री विखे पाटील यांनी दिला.

सुपा येथील अतिक्रमण काढण्याच्या मोहीमेत कोणतीही राजकीय सूडबुध्दी नाही.प्रशासनाने ही कारवाई केली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणची अतिक्रमण सगळीकडेच काढण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.यामुळे गुन्हेगारीला पाठबळ मिळत होते.पण ज्यांनी आशा भाडोत्री लोकांमार्फत आपला धंदा सुरू ठेवला आहे त्यांना वाईट वाटणे साहजिक असल्याचा टोला त्यांनी आरोप करणाऱ्यांना लगावला.

आचारसंहीता अद्याप शिथिल झाली नसली तरी टंचाईच्या बाबतीत सर्व सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.पाणी आणि चारा यांची टंचाई कुठेही भेडसावणार नाही याची दक्षता घेतली जात असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

# मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीचा कोल्हापुरातील कारागृहात खून

**आंघोळीवरून वाद, ५ कैद्यांनी केली बेदम मारहाण**

कोल्हापूर : प्रतिनिधी

**कोल्हापूर कारागृहात ५ कच्च्या कैद्यांनी १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीला बेदम मारहाण करत त्याच्या डोक्यात ड्रेनेजचे लोखंडी झाकण मारून खून केल्याची घटना रविवारी घडली. कारागृहातील हौदावर आंघोळीच्या कारणावरून झालेल्या बाचाबाचीनंतर हा प्रकार घडला.**




मुंबई बॉम्बस्फोट आरोपी मुन्ना ऊर्फ मोहंमद अली खान ऊर्फ मनोजकुमार भवरलाल गुप्ता (७०) कळंबा तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. प्रतीक पाटील, दीपक खोत, सौरभ सिद्ध, संदीप चव्हाण, ऋतुराज इनामदार अशी हल्लेखोरांची नावे आहेत.

**डोक्यात घातले ड्रेनेजचे लोखंडी झाकण**

मोहंमद अली खान सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास कारागृहातील हौदावर आंघोळीला गेला होता. या वेळी कारागृहातील इतर कैद्यांसोबत त्याचा वाद झाला. हा वाद विकोपाला गेला. त्यातून कैद्यांमध्ये हाणामारी सुरू झाली. या वेळी कैद्यांच्या एका गटाने मुन्ना ऊर्फ मोहंमद अली खानला बेदम मारहाण केली. यावेळी यातील एका आरोपीने ड्रेनेजवरील लोखंडी झाकण डोक्यात घालताच त्याचा जागीच मृत्यू झाला.

(पान १ वरून)

### सुजय विखे की नीलेश लंके?

मतदान असा पक्ष विरहीत नगरी फंडा झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे कोणी नेते फोडले तर कोणी कार्यकर्तेच फोडल्याचे राजकीय प्रयोग नगर दक्षिणेत पहायला मिळाले.

लोकसभा निवडणुकीचे भारत भरातील मतदान प्रक्रिया आटोपताच शनिवारी (ता. १) पासून विविध संस्थांकडून एक्झिट पोल व्यक्त करण्यात आले. यात टीव्ही ९, एबीपी माझा, लोकशाही मराठी व दैनिक सकाळने नीलेश लंके यांना तर दैनिक पुढारी, आयबीएन लोकमत, मुंबई तकने डॉ. सुजय विखे पाटील यांना मतदारांचा कौल मिळणार असल्याची शक्यता व्यक्त केली आहे. या परिस्थितीमुळे मतदार कोणाच्या पारड्यात विजयाचे दान देणार हे उद्या (मंगळवारी ) समजणार आहे.










# नीलेश लंके यांच्या शुभेच्छांनी निवृत्त कर्मचारी भारावले

■ पारनेर आगारातील आठ कर्मचाऱ्यांची सेवापूर्ती
■ एसटीचा ७६ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर आगारातील वाहतूक नियंत्रक,चालक,वाहक अश्या विविध पदांवरील आठ कर्मचारी शुक्रवारी ( ३१ मे) निवृत्त झाले. आज,शनिवारी (१ जून ) एसटीच्या ७६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधत एसटी प्रशासन व सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने सेवापूर्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा आग्रह माजी आमदार लंके यांच्याकडे धरला होता.मात्र लोकसभा निवडणुकीची मतमोजणी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेली असताना,व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून त्यांना कार्यक्रमास उपस्थित राहणे शक्य होईल का याबाबत साशंकता होती.मात्र कार्यक्रम सुरू झाल्यानंतर काही वेळातच लंके कार्यक्रमस्थळी आले. त्यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सत्कार केला. पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.आचारसंहिता असल्यामुळे बोलण्याचे मात्र टाळले.माजी आमदार लंके यांच्या शुभेच्छांमुळे सेवानिवृत्त कर्मचारी,त्यांचे कुटुंबीय,आप्तेष्ट,एसटीचे आजी माजी कर्मचारी भारावून गेले.

पारनेर आगारातील वाहतूक नियंत्रक नानाभाऊ दातीर,वाहक नंदू शिंदे,सुर्यभान वाळूंज,पंडितराव थोरात,गोपी साळवे,सुभाष शिंदे, बाळासाहेब दिवटे,चालक ज्ञानेश्वर ठुबे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक योगेश लिंगायत होते.पंचायत समितीचे माजी सदस्य डॉ.श्रीकांत पठारे,सैनिक सहकारी बँकेचे अध्यज्ञ शिवाजीराव व्यवहारे, संचालक साळवे,पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे, पत्रकार भास्कर पोपळघट,किरण ठुबे आदी उपस्थित होते.वाहतूक प्रमुख कुसकर,क्षेत्रे कार्यशाळा प्रमुख आरवडे,लेखा प्रमुख तारडे उपस्थित होते.सुरेश औटी यांनी सूत्रसंचालन केले.
यावेळी दहावीच्या परीक्षेत विषेश प्राविण्य मिळवलेल्या गोरे व सदिच्छा जाधव या एसटी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

### एसटीचा वर्धापनदिन उत्साहात

**एसटीचा ७६ वा वर्धापनदिन पारनेर आगारात उत्साहात साजरा करण्यात आला.नारळांच्या झावळ्यांनी बसस्थानक सजवण्यात आले होते.बसस्थानक परिसरात रांगोळी काढण्यात आली होती. आगार व्यवस्थापक योगेश लिंगायत यांनी सजवलेल्या एसटीची पूजा केली.प्रवाशांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात येत होते. आगारप्रमुख लिंगायत यांच्यासह अधिकाऱ्यांनी प्रवाशांना पेढे वाटून त्यांचे तोंड गोड केले.**

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी लढा उभारणार

**आचारसंहिता असल्याने भाषण करता आले नाही.मात्र एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची जाण आपणास आहे.त्यांच्या निवृती वेतनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील प्रसंगी लढा उभारण्यात येईल असे माजी आमदार नीलेश लंके यांनी पारनेर दर्शनशी बोलताना सांगितले.**

# कान्हुर पठार पाणी योजनेच्या उद्भव बदलण्याच्या हालचालींना वेग

■ दुरूस्तीसाठी ३८ कोटी ■ सर्वेक्षणास सुरवात
■ विश्वनाथ कोरडे यांच्या मागणीला यश



कान्हुर पठार : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील कान्हुर पठार १६ गाव पाणी पुरवठा योजनेच्या मांडओहळ धरण हा उद्धव बदलवून मुळा धरण बॅक वॉटर मधील पाण्यातुन करावा अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्याकडे भाजपा नेते विश्वनाथ कोरडे यांनी केली होती त्यास यश येत योजनेसंदर्भात सर्वेक्षणास सुरवात करण्यात आली.**

कान्हुर पठार येथील महादेव मंदिर सभागृहात जीवन प्राधिकरण विभागाचे शाखा अभियंता राजेंद्र चौधरी यांनी याबाबत सविस्तर माहीती दिली.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे,माजी उपसरपंच सागर व्यवहारे,अर्जुन नवले,कानिफनाथ ठुबे, दादाभाऊ ठुबे,संपत सोनावळे,संदीप ठुबे,संदीप मगर,भरत ठुबे, संतोष सोनावळे,सुनिल चिर्के यासंह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

या योजनेच्या दुरुस्तीसाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी ३८ कोटी रुपये मंजूर झालेले असून सबंधित योजनेचा उद्धव न बदलल्यास हा सर्व निधी व्यर्थ जाणार आहे.ऐन उन्हाळ्यात गरज असताना धरणात पाणी शिल्लक नसते यामुळे देखभाल दुरुस्तीमुळे आर्थिक अडचणीत येऊन ही योजना बंद पडते.

### महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरणार

**गेल्या खुप वर्षांपासून कान्हुर पठार सह परीसराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे यासाठी ठोस अशी भूमिका मागील राज्यकर्त्यांनी घेतली नाही.१६ गाव योजनेचा उदभव मुळा धरणातुन करावा जेणेकरून हा प्रश्न कायमाचा निकाली निघेल अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली त्यास यश येत सर्वेक्षणास आज सुरवात झाली आहे.**

**विश्वनाथ कोरडे**
**भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य.**

# बाबासाहेब फंड यांना राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार

कृषि कीर्तन नावीन्यपूर्ण उपक्रमाची दखल




पारनेर : प्रतिनिधी

**कृषि कीर्तन या नावीन्यपूर्ण शेतकरी प्रबोधनपर उपक्रमाबद्दल सारोळा अडवाई येथील रहिवाशी व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब फंड आणि डॉ शैलेश गावंडे यांना राजीव गांधी कृषि विज्ञान प्रतिष्ठान अमरावती द्वारा २०२४ चा राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार (संयुक्त) देऊन गौरवण्यात आले.**

कृषि विज्ञान केंद्र, घातखेड (जि. अमरावती) येथे आयोजित या पुरस्कार सोहळ्यात माजी मंत्री श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या हस्ते, राजीव गांधी कृषि विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाशदादा साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच कृषि विज्ञान केंद्र घातखेडचे सर्व विषय तज्ञ उपस्थित होते.

डॉ. अतुल कळसकर (वरीष्ठ शास्त्रज्ञ) आणि डॉ अमर तायडे (विषय तज्ञ ), केविके यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शेतकऱ्यांना शेती तंत्रज्ञान साध्या आणि सोप्या पद्धतीने समजावे यासाठी कृषि कीर्तनासारख्या अनोख्या उपक्रमाची सुरुवात केल्याबद्दल आणि असेच जास्तीत जास्त शेतकरीभिमुख काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करत वसुधाताईनी पुरस्कारार्थीचे अभिनंदन केले.

# शरीर शुद्धीबरोबर आत्मशुद्धीसाठी पंचकर्म उपयुक्त !

पंचकर्म प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सुजित झावरे यांनी सांगितला अनुभव...

पारनेर : प्रतिनिधी

**पंचकर्म प्रक्रियेला प्राचीन भारतीय काळापासून महत्व आहे. आरोग्य निरोगी राहण्यासाठी पंचकर्म प्रक्रिया अतिशय महत्त्वाची मानली जाते. पारनेर तालुक्याचे नेते अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी नुकतीच पंचकर्म प्रक्रिया पूर्ण केली त्यांच्या हा अनुभव त्यांनी सांगितला त्यांची एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे ती पोस्ट पुढील प्रमाणे...**

**नमस्कार**

पंचकर्म करण्याचा योग बरेच दिवसातुन आला या निमित्ताने काही अनुभव आपल्याजवळ व्यक्त करतो.आपल्या शरीरापेक्षा मोठी संपत्ती कोणतीच नाही.अनेक उद्योजकांचा व राजकीय नेत्यांचा या ठिकाणी सहवास लाभला. एक गोष्ट लक्षात आली की ह्या सर्वांजवळ नाव लौकिक, संपती असताना सुद्धा आरोग्य नसलेने मानसिक स्वास्थ्य नव्हते. श्री नारायण धाम म्हणजे एकमुखी दत्तांची अतिशय विलोभनीय मुर्ती. त्या ठिकाणी असलेले नारायण महाराज यांना साक्षात्कार झाले नंतर अतिशय त्यागातून हे आयुर्वेदिक पंचकर्म धाम उभारले.



अतिशय नम्र, सेवाभाव ओतप्रोत अंगी असलेला कर्मचारी वृंद हा तर अद्भुत च होता. कोणत्याही कामाची लाज नाही,तक्रार नाही, वेळेचे अतिशय काटेकोर पालन करून पहाटे ४ ते रात्री पर्यंत अविश्रांत सेवा देणारे डॉक्टर, नर्स, शिपाई, योगाटीचर, असंख्य कर्मचारी यांना द्यावेत तेवढे धन्यवाद कमीच आहेत.

अतिशय तुटपुंजे मानधन पण चेहर्यावर प्रचंड समाधान आपले सर्व आयुष्य आपण इथेच सेवार्थ समर्पित करणार आहोत असे निसंकोच ते सांगत असताना अशीही माणसे आहेत हे कळले. एका मावशींना मी टीप देऊ केली त्या म्हणाल्या साहेब पैशांच काय करायच य दत्तांच्या कृपेने सर्व मिळते, एक वेगळच जग बघायला मिळाले.अनेक मित्रांच्या ओळखी झाल्या सहज भेटले पण अतुट नाते मनात निर्माण केले. या सर्वांना निरोप देताना मी भावुक झालो. मला गाण्यांची आवड असलेने तिथे सर्वांसमोर रोज दिलखुलास कला सादर करायचो तेही भरभरून प्रतिसाद देत. अनेक आठवणी मनात घर करून गेल्या.

आता परत आपल्या सेवेत दाखल होतोय पण एक निस्वार्थी जगाशी माझी ओळख झाली. जगण्यासाठी फार काही लागत नाही जीव लावणारी, निस्वार्थी सहकारी असावेत, एवढेच

**सुजित झावरे पाटील**

# कासारे येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सहात साजरी

खेळ पैठणीच्या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



कासारे : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील कासारे येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर प्रतिष्ठान जयंती उत्सव मंडळ कासारे यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वच ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर प्रतिष्ठान जयंती उत्सव मंडळ कासारे यांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन अहिल्यादेवींची महाआरती करण्यात आली.

यानंतर कासारे गावातील महिलांसाठी होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. शंकर गवते प्रस्तुत लयभारी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा अन खळखळून हसण्याचा या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांनी प्रथमच विविध गेम शो मध्ये भाग घेतला. तसेच या खेळातील विजेत्यांना मानाची पैठणी, सोन्याची नथ, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

या कार्यक्रमांमध्ये कासारे येथील महिलांनी सहभाग घेतला प्रथम क्रमांक भारती भुसारी, द्वितीय क्रमांक मनीषा जाडकर, तृतीय क्रमांक अनिता दातीर, चतुर्थ क्रमांक पुष्पा खरात, पाचवा क्रमांक जयश्री दातीर, लयभारी खेळ पैठणीचा आजीबाई पैठणी सविता दातीर या महिलांना बक्षिसे मिळाली. तसेच या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक व महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

राजमाता अहिल्यादेवी प्रतिष्ठान सर्वोत्कृष्ट पुरस्कार सुनिता नरड (अशा सेविका), रोहिणी पानमंद (माजी सरपंच कासारे) यांना देण्यात आला. यावेळी हे प्रमुख उपस्थित माजी सरपंच कासारे धोंडीभाऊ दातीर सेवा सोसायटी चेअरमन तुळशीराम लगड,पोलीस निरीक्षक कोंडीभाऊ दातीर, बाळासाहेब दातीर, केतन दातीर, राजू दातीर, विजय दातीर, सुनील दातीर, गणेश दातीर, संदीप दातीर, गोपाळ दातीर, आकाश दातीर, आप्पासाहेब दातीर, शंकर दातीर, डॉ. विनायक दातीर, रवींद्र शिंदे, संपत दातीर, माऊली दाते, सोन्याबापू दातीर, प्रभाकर दातीर, अमोल रकटे, बबन दातीर, संतोष दातीर, रेवजी दातीर, गोविंद दातीर, विकास दातीर, राहुल दातीर, ओम दातीर, संचित दातीर, मंजुषा दातीर आदी मान्यवर तसेच कासारे गावातील ग्रामस्थ महिला युवक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक संतोष दातीर यांनी केले तर माजी सरपंच धोंडिभाऊ दातीर यांनी सर्वांचे आभार मानले.

### सेवानिवृत्त सत्कार समारंभ

**बबन दातीर (ग्रामविकास अधिकारी पोखरी), शरद दातीर मेजर (आदिवासी विकास प्रकल्प, राजुर), नानासाहेब दातीर (वाहक नियंत्रक पारनेर डेपो), विकास दाते मेजर (इंडियन आर्मी) या गावातील शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या भूमिपुत्रांचा सेवापूर्ती निरोप समारंभ आयोजित करून यावेळी सन्मान करण्यात आला.**

# गंगाराम शिंदे यांचे निधन; कुटूंबवत्सल व्यक्तीमत्व हरपले

माळकुप : प्रतिनिधी

**येथील गंगाराम बबन शिंदे यांचे रविवारी अल्पआजाराने निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते.कुटूंबवत्सल व्यक्तीमत्व हरपल्याने हळहळ व्यक्त होत आहे.**

कै. गंगाराम शिंदे यांचा जन्म माळकुप येथील सर्वसामान्य शिंदे परिवारात झाला. प्रचंड जिद्द, चिकाटी त्यांच्यात होती. त्याचबळावर नगर येथील एमआयडीसीत खाजगी कारखान्यात काम करताना त्यांनी स्वताःचा उद्योग व्यवसाय उभारला. प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी दोन मुले किशोर आणि सचिन यांचे उच्च शिक्षण पुर्ण केले. दोन्हीही मुले आज पुण्यात आयटी क्षेत्रात उच्चपदावर कार्यरत आहेत.

नोकरी व्यवसायानिमित्त मुले पुण्यात स्थिरावल्यानंतर काही वर्षापासून कै. गंगाराम शिंदे हे देखील आळंदीत रहिवासले होते. परंतू आपल्या मायभूमीप्रती त्यांचे प्रेम, ओढ कायम होती. सर्वच नातेवाईकांविषयी त्यांना आत्मीयता होती.सर्वांच्याच सुख दुः खात ते सहभागी होत. कुटूंबात ते थोरले असल्याने या काळात देखील त्यांनी शेवटपर्यंत एकत्रित कुटुंब व्यवस्था सांभाळली.

अध्यात्मिक वारसा जतन केलेल्या



कै.गंगाराम शिंदे यांनी पंढरपूर, आळंदीच्या पायी वाऱ्या केल्या.पांडूरंगाचे ते निस्सिम भक्त होते. काही वर्षांपासून ते आजारी होते. त्यांच्या प्रकृतीत चढउतार होत होता. परंतू प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी काही काळ आजारावर मात केली. मात्र आजार बळावत गेल्यानंतर अखेर रविवारी त्यांचे निधन झाले. शोकाकुल वातावरणात माळकुप येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी,दोन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

# रमेश वाळुंज यांचे निधन

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील वडनेर हवेली येथील रमेश बापुराव वाळुंज यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. रमेश वाळुंज हे सहाय्यक निबंधक कार्यालय शिरूर येथे सहकारी अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.**

त्यांच्या अचानक जाण्याने परिसरात



हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर वडनेर हवेली येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com